ePaper
“अजित पवार मुख्यमंत्री होणार, ही काळ्या दगडावरची पांढरी रेष”:आ.राजेंद्र शिंगणे

| वर्ष - 7 । अंक - 158 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 14 ऑक्टोंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत

- न्यूझीलंडने साधली विजयाची हॅट्रिक!
- ऐश्वर्याचे श्वेताशी फारसं पटत नाही!
- युद्धाचे उत्तर प्रदेशात पडसाद!
- बिनबुडाच्या आरोपांना भीक घालत नाही!

# पिंपरी-चिंचवडमध्ये “उडतापंजाब”!

## » दोघे गजाआड : 13 लाख रुपयांचे ड्रग्ज जप्त

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंबई येथून पिंपरी-चिंचवड शहरात विक्रीसाठी आणलेले मेफेड्रॉन (एमडी) पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी पथकाने चिखली येथे जप्त करत दोघांना अटक केली. त्यांच्याकडून ११६ ग्रॅम मेफेड्रॉन ड्रग्ज जप्त केले. ही कारवाई मंगळवारी (दि.१०) सायंकाळच्या सुमारास केली.**

### संशयिताविरोधात गुन्हा...



» दोघांकडे ११६ ग्रॅम मेफेड्रॉन ड्रग्ज आढळून आले. एकूण १३ लाख ३५ हजार ५९० रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. संशयितानी हे ड्रग्ज गोरेगाव मुंबई येथून महंमद शकील ऊर्फ गुप्ता याच्याकडून आणला असल्याचे सांगितले. त्यामुळे महंमद शकील ऊर्फ गुप्ता याच्या विरोधात गुन्हा दाखल केला.



पिंपरी: रामकुमार रामसजीवन मिश्रा (४५, रा. नालासोपारा, पालघर. मूळ रा. उत्तर प्रदेश), अब्दुल मुशरफ अली कलीम ऊर्फ सिद्दिकी (३५, रा. कुदळवाडी, चिखली. मूळ रा. उत्तर प्रदेश) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी पोलिस अंमलदार प्रसाद जंगीलवाड यांनी बुधवारी (दि. ११) चिखली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. जाधववाडी कुदळवाडी रस्त्यावर वडाचामळा येथे दोघे जण संशयितपणे थांबले असून त्यांच्याकडे अमली पदार्थ असल्याची माहिती पथकाला मिळाली.

पोलिसांनी रामकुमार आणि अब्दुल या दोघांना ताब्यात घेतले. कसून चौकशी केली असता मेफेड्रॉन ड्रग्ज विक्रीसाठी आणले असल्याचे त्यांनी सांगितले.

# पिंपरी चिंचवड भाजपमध्ये भूकंप होणार!

## » नितीन गडकरी यांचा खंदा समर्थक ठाकरेंचे हात बळकट करणार

। पिंपरी चिंचवड ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी शरद पवार यांच्याविरोधात जाऊन सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतल्याने अनेक राजकीय समीकरणे बदलली आहेत. त्यातच अजित पवार यांचा बालेकिल्ला असलेल्या पिंपरी चिंचवडमधून मोठी राजकीय घडामोड समोर आली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे खंदे समर्थक एकनाथ पवार हे लवकर उद्धव ठाकरे यांच्या गटात सामील होणार आहेत. त्यामुळे पिंपरी चिंचवड भाजपाला मोठा धक्का मानला जात आहे.**

राज्याच्या राजकारणात अनेक पक्षात इनकमिंग आऊटगोइंग सुरू आहे. अशातच पिंपरी चिंचवडमधील एकनाथ पवार यांच्या आऊटगोइंगने भाजपला मोठा धक्का बसणार आहे. येत्या २५ तारखेला एकनाथ पवार मुंबई येथे मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवबंधन हाती घेणार असल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांनी सांगितले आहे. तसेच त्यांना उद्धव ठाकरे गटाकडून भोसरी विधानसभेचे तिकिट मिळणे शक्यता वर्तवली जात आहे. भाजपमध्ये असताना त्यांना फारसे बळ मिळत नसल्याने त्यांनी हा निर्णय घेतला असल्याचे बोलले जात आहे.

याबाबत एकनाथ पवार यांनी 'मटा ऑनलाइन' शी बोलताना सांगितले की, मी याबाबत नवरात्रीमध्ये माझी भूमिका पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट करणार आहे. तसेच येत्या काही दिवसात तसे चित्र देखील पहायला मिळेल' असे त्यांनी सांगितले. अजित पवार यांनी सत्तेत सहभागी झाल्यानंतर पिंपरी चिंचवड येथील अनेक जुने जाणकार नेते शरद पवार यांच्यासोबत येण्याची तयारी करू लागले आहेत. काहींनी प्रवेश देखील केला आहे. त्यामुळे हे प्रवेश अजित पवारांना शह देणारे आहेत.



### एकनाथ पवार गडकरींचे खंदे समर्थक

» एकनाथ पवार हे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे खंदे समर्थक मानले जातात. त्यांनी २०१४ ला भोसरी विधानसभा लढवली होती. त्यावेळी त्यांना ५२ हजार मते पडली होती. त्यानंतर त्यांनी मागच्या वेळी महापालिकेत सभागृह नेते म्हणून काम पाहिले होते. गेले अनेक दिवस ते भाजप सोबत एकनिष्ठ आहेत. मात्र त्यांनी भाजप सोडण्याचा निर्णय घेतल्याने भोसरीमध्ये भाजपला धक्का देखील बसू शकतो, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

# महावितरण कार्यालयासमोर पिंपरीमध्ये स्थानिकांचे आंदोलन

। पिंपरी ।महाईन्यूज ।

गेल्या दोन वर्षापासून पिंपरीगावातील कुदळे कॉलनी क्रमांक १, २, ३, ४ व कुदळे पडाळ क्रमांक १, २, ३ परिसरात होणाऱ्या अनियमित वीज पुरवठ्याबाबत स्थानिकांनी महावितरणच्या कार्यालयासमोर आंदोलन केले. आंदोलकांनी कार्यकारी अभियंता यांना मागणीचे सामुहिक निवेदन दिले. सकाळी दहापासून आंदोलन पुकारले होते. स्थानिकांनी जोरदार घोषणा दिल्या. पिंपरीगावातील कुदळे कॉलनीमध्ये अनियमित - खंडित विजेची समस्या आहे. नागरिकांना विजेच्या अनियमित खंडित पुरवठ्यामुळे नाहक त्रास होत आहे. याबाबत स्थानिकांनी सामूहिक अर्ज केला होता. रोहित्र, वीज वाहिनी, एल. डी. फिडर पिलर बॉक्स, उच्चदाब वीज वाहिन्यांवरील झाडांच्या फांद्या तोडणे, वीजभार संतुलित ठेवणे आदी प्रकारची देखभाल व दुरुस्तीची कामे महावितरणने करणे अपेक्षित आहे. त्यामुळे आंदोलन करण्यात आले.




आंदोलनात सुहास कुदळे, नवनाथ कुदळे, निकेतन कुदळे, विनोद कुदळे, गजानन गवळी, तानाजी कुदळे, दिगंबर कुदळे, राहुल कुदळे, आनंदा कुदळे, विकास कुदळे, गणेश कुदळे, प्रतीक बगाडे, विशाल शिंदे, राकेश क्रिपलानी, अक्षय निकम, चेतन उपाले, शैलेश शिरसाट आदी नागरिक सहभागी होते.

# मोबाईल टॉयलेटच्या निविदेसाठी घाई!

## » निविदा भरण्यापासून कोणालाही रोखले जात नाही

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**गणेशोत्सवाच्या काळात ४४ लाख रुपये खर्च करून मोबाईल टॉयलेटची निविदा काढण्यात आली. या सेवेत त्रुटी असल्याने त्याच्या अनेक तक्रारी गेल्या. त्यानंतर आता पुढील वर्षभरासाठी आणखी एक २५ लाख रुपयांची निविदा काढण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभागात गडबड सुरु आहे.**




तसेच या निविदेत स्पर्धा होऊ नयेत यासाठी ठेकेदारांना तुम्ही निविदा भरू नका असे निरोप जात असल्याने याची प्रशासनातही चर्चा रंगली आहे. महापालिकेतर्फे पालखी सोहळा, गणेशोत्सव या काळात नागरिकांच्या सोईसाठी मोबाईल टॉयलेटची व्यवस्था केली जाते. यंदा गणेशोत्सवासाठी ठेकेदार नियुक्त केला होता, पण त्याने व्यवस्थित काम न केल्याने त्याला ५ लाख रुपयांचा दंड केला व त्याच्याकडून हे काम काढून घेण्यात आले. त्यानंतर गणेशोत्सवाच्या काळात शहराच्या विविध भागात ४०० मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करण्यात आली. या प्रत्येक टॉयलेटला प्रतिदिन ११०० रुपये भाडे होते. गणेशोत्सवात यासाठी ४४ लाखाचा खर्च झाला आहे. पण अनेक टॉयलेट स्वच्छ नव्हती, स्वच्छता गृहांच्या दाराला कडी नव्हती, परिसरात प्रकाश व्यवस्था नव्हती, स्वच्छतागृहाबाहेर पाण्यासाठी ड्रम ठेवला असला तरी पाणी घेण्यासाठी छोटे बकेट, मग व्यवस्था नव्हती. त्यामुळे ठेकेदाराच्या कार्य पद्धतीवर टीका करत याची चौकशी करण्याची मागणी केली आहे. गणेशोत्सवानंतर भविष्यात कोणताही उत्सव नसतानाही २५ लाख रुपयांची निविदा काढली आहे. त्यासाठी ७ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोबर अशी मुदत आहे. या अल्पमुदतीच्या निविदा काढताना याचे अधिकार विभाग प्रमुखांकडेच असले पाहिजेत याची काळजी घेत २५ लाखापेक्षा कमी रकमेची निविदा काढली आहे. आता निविदेची गरज काय आहे?, ही निविदा पुढच्या पालखी सोहळा, गणेशोत्सवासाठी असेल का?, सध्या कोणतीही गडबड नसताना अल्प मुदतीची निविदा का काढली? याबाबत अधिकाऱ्यांकडे चौकशी केली असता याची समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. उपायुक्त संदीप कदम म्हणाले, 'वारीच्या काळात १५ लाख तर गणेशोत्सवासाठी ४४ लाख रुपयांची निविदा होती.

### मंत्र्याच्या नावाने दबाव

» प्रशासनावर वचक असलेला नेता अशी ओळख असलेल्या एका मंत्र्यांच्या पीएच्या माध्यमातून ही निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी हालचाल सुरु आहे. गणेशोत्सवातही मंत्र्याच्या पीएने अनेकांवर दबाव आणला होता. आता या २५ लाखाच्या निविदेतही ठेकेदारांना मंत्र्यांचे नाव घेऊन तुम्ही निविदा भरू नका असे कर्मचारी फोन करत आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# २७ वर्षांनी क्रिकेटचे सामने!

## » तिकीट ब्लॅक होत असल्याने चाहते नाराज

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**२७ वर्षांनंतर पुण्यामध्ये क्रिकेट विश्वचषकाचे सामने होणार आहेत. १९ ऑक्टोबर रोजी भारत विरुद्ध बांगलादेश क्रिकेटचा सामना पुण्यातील एमसीए मैदानावर होणार आहे. असं असलं तरी क्रिकेट चाहत्यांमध्ये मात्र नाराजी असून ऑनलाईन तिकीट मिळत नसल्याने अनेक क्रिकेट चाहते गहुंजे क्रिकेट स्टेडियम परिसरात गर्दी करत आहेत.**



### एमसीएवर खेळले जाणार पाच सामने

» पुण्यातील एमसीए क्रिकेट मैदानावर विश्वचषकाचे पाच सामने खेळवले जाणार आहेत. पहिला क्रिकेटचा सामना हा भारत विरुद्ध बांगलादेश असा रंगणार आहे. त्यानंतर इतर देशांचे सामने खेळवले जातील. भारत विरुद्ध बांगलादेश या क्रिकेट सामन्याचे तिकीट ऑनलाईन पद्धतीने न मिळाल्यामुळे अनेक क्रिकेट चाहते नाराज आहेत. ते स्टेडियम परिसरात हजेरी लावत आहेत. तिकीट मिळतं की नाही याची चौकशी करत आहेत.

तिकीट मिळेल या आशेने चाहते स्टेडियम परिसरात दाखल होत असले तरी तिकीट हे केवळ ऑनलाईन पद्धतीनेच उपलब्ध होणार आहे. नाराज क्रिकेटच्या चाहत्यांनी क्रिकेट सामन्यांची तिकीट ब्लॅक होत असल्याचा आरोप करत थेट बीसीसीआय आणि एमसीएला प्रश्न विचारला आहे. पुण्यातील एमसीए क्रिकेट मैदानावर विश्वचषकाचे पाच सामने खेळवले जाणार आहेत. पहिला क्रिकेटचा सामना हा भारत विरुद्ध बांगलादेश असा रंगणार आहे. त्यानंतर इतर देशांचे सामने खेळवले जातील. भारत विरुद्ध बांगलादेश या क्रिकेट सामन्याचे तिकीट ऑनलाईन पद्धतीने न मिळाल्यामुळे अनेक क्रिकेट चाहते नाराज आहेत. ते स्टेडियम परिसरात हजेरी लावत आहेत. तिकीट मिळतं की नाही याची चौकशी करत आहेत. प्रत्यक्षात मात्र स्टेडियममध्ये तिकीट विक्री नाही. केवळ ऑनलाईन तिकीट विक्री करण्यात येते आहे. परंतु, या ठिकाणी अनेक क्रिकेट प्रेमींनी तिकिटांचा ब्लॅक, काळा बाजार होत असल्याचा आरोप केला आहे. याचा थेट फटका प्रेक्षकांना बसला असल्याचे त्यांनी म्हटल आहे. अवघ्या बाराशे रुपयांचं तिकीट हजारो रुपयांना विक्री करत असल्याचा आरोप क्रिकेट चाहत्यांनी केला आहे आणि याचा फटका चाहत्यांना बसत असून त्यांनी बीसीसीआय आणि एमसीएबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. अवघ्या देशभरात विविध राज्यांत मैदानांवर विश्वचषकाचे क्रिकेटचे सामने खेळवले जात आहेत. असा दाखला देत तिकिटांसंदर्भात गलथान कारभार झाल्यानेच स्टेडियममध्ये गर्दी होत नाही, असा आरोप त्यांनी केला आहे.

# ३४ गावांतील सांडपाणी वाहिन्यांचे काम निकृष्ट?

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।



महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांमधील सांडपाणी वाहिन्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याच्या आरोपानंतर शासकीय अभियांत्रिकी विद्यापीठामार्फत या कामांची तपासणी करण्यात येणार आहे. मुंबई येथील बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे गावातील सांडपाणी वाहिन्यांच्या कामाची पोलखोल होण्याची शक्यता आहे. विधिमंडळाच्या अधिवेशनात खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर यांनी यासंदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता.

या कामांची उच्चपदस्थ अधिकाऱ्यांकडून चौकशी व्हावी, अशी मागणीही त्यांनी केली होती. विधीमंडळातील आश्वासनासंदर्भातील पूर्तता करण्यासंदर्भात मुंबईत बैठक झाली. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार यांनी दिली.

महापालिका हद्दीमध्ये ऑक्टोबर २०१७ मध्ये ११ गावांचा आणि त्यानंतर जुलै २०२१ मध्ये २३ गावांचा अशा एकूण ३४ गावांचा समावेश करण्यात आला आहे. त्यापैकी समाविष्ट ११ गावांसाठी महापालिकेने ४२५ कोटींचा सांडपाणी वहन व्यवस्था आराखडा केला असून त्याला स्थायी समितीनेही मंजुरी दिली होती.

या गावातील २०४७ सालापर्यंतची लोकसंख्या गृहीत धरून हा आराखडा करण्यात आला आहे. त्यानुसार ११ गावांमध्ये १८३ किलोमीटर लांबीच्या सांडपाणी वाहिन्या टाकण्याची कामे केली जाणार आहेत. तसेच दोन सांडपाणी प्रकल्प प्रस्तावित आहेत. त्यांची कामे सुरू असून, त्याबाबत आमदार तापकीर यांनी आक्षेप घेतला होता.

# चिखलीकरांचा पाणी प्रश्न निकालात!

## आंद्रा प्रकल्पाच्या पाण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था

### आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिखली आणि परिसरातील सुमारे ९० हजार नागरिकांच्या पाणीपुरवठा सक्षम करण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून चिखली जलशुद्धीकरण केंद्रातून थेट पाईपद्वारे पाटीलनगर येथील जलकुंभात पाणी दिले जाणार आहे. त्यामुळे पवना आणि आंद्रा प्रकल्पातील एकत्रित पाणी मिळाल्यामुळे या भागातील पाणी समस्या निकालात निघणार आहे.**





चिखली आणि परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणी प्रश्नाबाबत स्थानिक नागरिकांनी अनेकदा प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत. याबाबत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आणि हा प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लावण्याबाबत उपाययोजना करण्याची सूचना प्रशासना केली होती.

पाटीलनगर येथे महापालिका प्रशासनाने २० लाख लीटर क्षमतेचा जलकुंभ उभारला आहे. या टाकीमध्ये पवना प्रकल्पातील रावेत बंधाऱ्यातून सुमारे १६ एमएलडी पाणी दिले जाते. एक दिवस २० ते २२ तास आणि दुसऱ्या दिवशी तीन ते चार तास पाणी पुरवठा होतो. आता प्रशासनाने आंद्रा प्रकल्पातील पाण्यासाठी चिखली येथे नवीन जलशुद्धीकरण केंद्र उभारले आहे. त्यातील पाणी पाटीलनगर येथील पाण्याच्या टाकीत आणण्यासाठी ६०० एमएम पाईपलाईन टाकण्यात आली आहे. त्यामुळे पवना आणि आंद्रा अशा दोन्ही प्रकल्पाचे पाणी उपलब्ध झाल्यामुळे पाणी पुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

दरम्यान, महापालिका प्रशासनाच्या वतीने आंद्राचे पाणी पाटीलनगर टाकीत आणण्यासाठी पंप बसवण्यात येणार आहे. तो पंप जलशुद्धीरकण केंद्रात दाखल झाला. यावेळी भाजपाचे माजी नगरसेवक कुंदन गायकवाड, अंकुश मळेकर, विनायक आबा मोरे,पांडुरंग साने, संदिप शेलार आदी उपस्थित होते.

### आंद्रा पाणी वितरण व्यवस्था अंतिम टप्प्यात...

» समाविष्ट गावांतील पाणी पुरवठा सक्षम करण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी व्हीजन-२०२० अंतर्गत आंद्रा व भामा आसखेड प्रकल्पाचे काम हाती घेतले. त्यातील आंद्रा प्रकल्पाचे १०० एमएलडी पाणी चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रात दाखल झाले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते या जलशुद्धीकरण केंद्राचे लोकार्पण करण्यात आले होते. सदर पाणी वितरण व्यवस्था अंतिम टप्प्यात आहे. चिखली, चऱ्होली, मोशी, डुडूळगाव, जाधववाडी, दिघी आदी गावांतील पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे समाविष्ट गावांचा पाणी प्रश्न कायमस्वरुपी सुटण्यास मदत होईल.

### ...या भागातील पाणी पुरवठा होणार सक्षम!

» आंद्रा प्रकल्पातून अतिरिक्त पाणी उपलब्ध झाल्यामुळे पाण्याची टाकी भरण्यास मदत होईल. टाकीसाठी सध्या एक पंप आहे. आणखी एक पंप उपलब्ध करण्याबाबत प्रशासन प्रयत्न करीत आहे. त्यामुळे जास्तीत-जास्त पाणीसाठा होण्यास मदत होईल. चिखली गावठाण, रामदासनगर, नागेश्वर विद्यालय, रामदास नगर टप्पा, महादेवनगर, भांगरे कॉलनी, धर्मराज नगर, शेलारवस्ती, पाटीलनगर, देहू-आळंदी रस्ता, राम मंदिर डिफेन्स कॉलनी या भागातील पाणी पुरवठा सक्षम होणार आहे.



“ पिंपरी-चिंचवड शहरासह माझ्या भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावांत भविष्यातील ३० वर्षांच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन पाणी पुरवठा यंत्रणा सक्षम करण्याचा आमचा निर्धार आहे. आंद्रा प्रकल्पातील पाणी शहरात दाखल झाले आहे. तसेच, भामा आसखेड प्रकल्पाचे कामही प्रगतीपथावर आहे. चिखलीसह समाविष्ट गावातील पाणी पुरवठा सक्षम करण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही केली आहे. लवकरच आंद्राचे पाणी पाटीलनगर येथील पाण्याच्या टाकीत दाखल होईल. त्यामुळे पाणी समस्या सोडवण्यास मदत होईल. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात अडीच वर्षे शहरातील विविध प्रकल्प रखडले. विकासकामे प्रलंबित राहीली. पण, आता महायुतीच्या सत्ताकाळात विकासकामे मार्गी लागत आहेत, ही समाधानाची बाब आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली शहराचा पाणी प्रश्न कायमस्वरुपी सोडवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

- **महेश लांडगे,** भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड..


---

# पिंपरी-चिंचवडकरांसाठी ‘पोस्ट अ वेस्ट’ सुविधा

## महापालिकेचा पुढाकार : समस्या सोडवण्यासाठी ‘प्लॅटफॉर्म’

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने नागरिकांसाठी ‘पोस्ट अ वेस्ट’ नावाची संकल्पना सादरीकरण करून नागरिकांसाठी उपलब्ध केलेली आहे. महानगरपालिकेचे अधिकृत संकेतस्थळ WWW. PCMCINDIA.GOV.IN किंवा मनपाचे सारथी मोबाईल अँप याद्वारे सदर योजनेचा लाभ नागरिक घेऊ शकतात.**




POST A WASTE हे नागरिकांना शहरांमध्ये कोठेही झाडांच्या फांद्या तोडून ठेवल्या असतील, काढलेले गवत आदी. हिरवा कचरा, बांधकामाचा राडारोडा, हॉटेल, खानावळ, मंगल कार्यालय यांचे शिल्लक अन्न, खरकटे तसेच इलेक्ट्रॉनिक कचरा अश्या चार प्रकारातील कचरा उचलणे व त्याबाबत तक्रारी करणेकामी ऑनलाईन स्मार्ट सारथी ॲपमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

सदर तक्रार ही महानगरपालिकेने नेमून दिलेल्या एजन्सीकडे नोंद होऊन त्वरित निपटारा करण्यासंबंधी कारवाई केली जाणार आहे. नागरिकांनी सदर तक्रारी मधील असुविधेचा फोटो या एप्लीकेशन मध्ये अपलोड करून आपली तक्रार नोंदवायची आहे. या तक्रारीचा क्रमांक नागरिकांना त्वरित ऑनलाईन पद्धतीने दिला जाईल. सदर एजन्सीने तक्रारीचा निपटारा करून ऑनलाइन पद्धतीने त्याची नोंद घ्यायची आहे जेणेकरून नागरिकास तक्रार निवारण बाबत त्वरित माहिती उपलब्ध होईल. तसेच त्या जागेचा फोटो एप्लीकेशन मध्ये अपलोड करायचा आहे.

### समस्या सोडवण्यासाठी प्लॅटफॉर्म...

» ॲपद्वारे नागरिकांना तक्रार करते वेळेची स्थिती व तक्रारीचा निपटारा झाल्यानंतरची स्थिती फोटोच्या माध्यमातून पाहण्यास व तपासण्यास मागणी नुसार उपलब्ध राहील. तक्रारीचा ठराविक वेळेमध्ये निपटारा न झाल्यास आरोग्य विभाग, पर्यावरण विभाग यांच्याकडून सदर एजन्सीवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. या स्मार्ट सारथी अँपमध्ये निर्माण करून दिलेल्या सुविधेमुळे नागरिकांच्या तक्रारी कमी होऊन वेळेत निपटारा होणेस मदत होणार आहे. आरोग्य विभाग, पर्यावरण विभाग, उद्यान विभाग यांच्याकडून माहिती घेऊन सदर एप्लीकेशन तयार करण्यात आले आहे. तथापि सर्व नागरिकांनी याचा जास्तीत जास्त लाभ घेऊन आपली तक्रार नोंदवावी व समस्या निराकरण करण्यासाठी याचा वापर करावा असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.




# आरोग्य व्यवस्था सुधारणार कधी ?

**नांदेड, ठाणे, छत्रपती संभाजीनगरातील शासकीय रुग्णालयांमधील रुग्णांच्या मृत्यूनंतर आरोग्य खात्याचे पार धिंडवडे निघाले. नांदेडमध्ये लहान बालके दगावली. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातील मोठ्या शहरांमधील हे विदारक चित्र. शासकीय रुग्णालयांमध्ये डॉक्टर, परिचारिका, निमवैद्यकीय कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त आहेत.**

ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांची अवस्था तर बिकट आणि गंभीर आहे. सामान्य रुग्णालयांची अवस्था फार वेगळी नाही. कोणतीही दुर्घटना घडल्यावर औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचा दावा राज्यकर्त्यांकडून ठामपणे केला जातो. पण प्रत्यक्षात औषधे उपलब्ध नसतात. विविध स्वयंसेवी संघटनांनी प्रत्यक्ष भेटी देऊन आरोग्य खात्यातील या संदर्भातील गलथानपणा उघडकीस आणला. 'राज्यातील १२ कोटी नागरिकांना शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत उपचार किंवा सर्व नागरिकांना पाच लाखांचा विमा' अशा घोषणा करून मुख्यमंत्री सरकारला कशी जनतेच्या आरोग्याची काळजी आहे, याचे दाखले देत असतात. दुसरीकडे, शहरांमधील शासकीय रुग्णालयांमध्ये मृत्यूचे थैमान थांबत नाही. राज्यात कोठेही दुर्घटना झाल्यावर लगेचच धावून जाणारे मुख्यमंत्री शिंदे



नांदेडमध्ये मृत्यूने थैमान घातले असताना तेथे फिरकले नाहीत. आपल्याकडे आग लागल्यावर विहीर खणण्याचा प्रकार नेहमीच बघायला मिळतो. एखादी दुर्घटना घडल्यावर शासकीय यंत्रणांना जाग येते. तसेच आरोग्य खात्याचे झाले आहे. शासकीय रुग्णालयांमध्ये रुग्ण दगावल्यावर त्याची शासनाला दखल घ्यावी लागली. राज्याची आरोग्य यंत्रणा अद्ययावत करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. तसेच सर्व जिल्ह्यांमध्ये सुसज्ज अशी मल्टीस्पेशालिटी रुग्णालये उभारणे, ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणा मजबूत करण्याकरिता युद्धपातळीवर पाऊल टाकणे, आरोग्य खात्यावरील तरतूद दुप्पट करणे याबरोबरच ३४ जिल्ह्यांमध्ये वैद्यकीय महाविद्यालयांच्या सर्व सुविधायुक्त जिल्हा रुग्णालये उभारण्याचा आराखडा तयार करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. औषधे आणि उपकरणे खरेदीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या साऱ्या उपायांवर नजर टाकल्यास राज्याची आरोग्य व्यवस्था अद्ययावत होण्यात काहीच अडचण येऊ नये, असे वरवर दिसणारे चित्र. परंतु वस्तुस्थिती मात्र वेगळी आहे. आरोग्यावरील खर्च दुप्पट करण्याचा आदेश मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे सरकारी प्रसिद्धिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. पण २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय कागदपत्रांवर नजर टाकल्यास २०२२-२३ सुधारित अंदाजपत्रकापेक्षा चालू आर्थिक वर्षांत (२०२३-२४) आरोग्य खात्याची तरतूद कमी करण्यात आली आहे. शिक्षण आणि आरोग्य या दोन खात्यांसाठी करण्यात येणारी बहुतांशी तरतूद ही वेतनावरच खर्च होते. दोन्ही विभागांमध्ये पायाभूत सुविधांसाठी फार कमी निधी वाटय़ाला येतो. आरोग्य खात्यावर एकूण अर्थसंकल्पीय तरतुदीच्या ३.६७ टक्के तरतूद करण्यात आली आहे. महसुली उत्पन्न आणि खर्च याचा मेळ घालताना सरकारला सध्या तारेवरची कसरत करावी लागते. त्यातून विविध योजनांमध्ये कपात करावी लागते. अशा परिस्थितीत आरोग्य खात्याचा खर्च दुप्पट कसा करणार? आरोग्याच्या पायाभूत सुविधांवरील अपेक्षित खर्च झाला पाहिजे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. प्रत्यक्षात आरोग्य खात्याकडून यंत्रणा सुधारण्याकरिता वाढीव खर्चाची मागणी दरवर्षी अर्थसंकल्पापूर्वी वित्त विभागाकडे केली जाते. पण निधीच्या तरतुदीत आरोग्य खात्याला दुय्यम वागणूक मिळते, असा अनुभव आरोग्य खात्याच्या अधिकाऱ्यांना येतो. सर्व जिल्ह्यांमध्ये सर्व सुविधांयुक्त स्पेशालिटी रुग्णालये उभारण्याचे जाहीर करण्यात आले. अशी रुग्णालये उभी राहिली तर जनतेला त्याचा लाभच होईल. पण रुग्णालये उभारली तरी पुरेसे डॉक्टर्स उपलब्ध होणार आहेत का? सरकारी सेवेतील डॉक्टरांचा कल हा मुंबई, ठाणे, पुणे, नाशिकपुरताच मर्यादित असतो. मराठवाडय़ात जाण्यास डॉक्टर मंडळी उत्सुक नसतात. रुग्णालये उभारल्यावर त्यात रुग्णांवर योग्य उपचार होतील याची खबरदारी सरकारला घ्यावी.

## संपादकीय »

# तेल तडतडणार?

***विद्यमान अध्यक्ष जो बायडेन यांच्या काळात इराणवरील निर्बंध उठवले गेले; पण या तेलविक्रीतून आलेला निधी अमेरिकेने अद्यापही इराणच्या पदरात पडू दिलेला नाही.***

विविध जागतिक वित्तसंस्थांतील ऊर्जाभ्यासक, विश्लेषक आणि जागतिक भांडवली बाजार सध्या कोणत्या घटकावर नजर ठेवून असेल तर तो म्हणजे खनिज तेलाचे दर. याच काळात ५० वर्षांपूर्वी झालेल्या योम किप्पुर युद्धामुळे खनिज तेल दराचा भडका उडाला होता. त्या वेळी इजिप्त-सीरिया यांच्या पुढाकाराने इस्रायलवर हल्ला केला गेला आणि नंतर तेलसंपन्न देशांनी अमेरिकेची तेल-नाकेबंदी केली. जे काही झाले त्यामुळे तेलाच्या दरात तब्बल ४०० टक्क्यांची वाढ झाली. या युद्धाआधी तेलाचे दर प्रतिबॅरल ३ डॉलर्स इतके होते ते १२ डॉलर्सवर गेले. तेव्हापासून इस्रायल आणि युद्ध म्हटले की पाठोपाठ खनिज तेल दरांत वाढ होणार हे ओघाने आले. आताही तेच झाले. फक्त फरक इतकाच की त्यावेळच्या योम किप्पुरनंतरच्या दरवाढीप्रमाणे खनिज तेलाच्या दरांनी उसळी वगैरे घेतली नाही.

**भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त केंद्र शासनाने १२ फेब्रुवारी २०२० पासून प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना किसान क्रेडिट कार्ड (केसीसी) उपलब्ध करून देण्याविषयी मोहीम सुरू केली आहे. या अंतर्गत 'किसान भागीदारी प्राथमिकता हमारी' ही मोहीम राबवण्यात येत आहे. या अंतर्गत शेतकरी, पशुपालकांकडून अर्ज भरून घेण्याची देशव्यापी मोहीम हाती घेण्यात आली आहे.**

# चांगल्या योजनेची वाट लागू नये

सहकार, महसूल, ग्रामविकास, कृषी, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास, मत्स्य व्यवसाय विकास नाबार्ड आणि महत्त्वाचे म्हणजे जिल्हा अग्रणी बँकेच्या समन्वयाने सदर मोहीम राबविण्याची आहे. राज्यातील विशेषतः सहकारी दूध सोसायट्या, दूध संघ, दूध उत्पादक कंपनीच्या सभासदांसाठी म्हणजे दूध उत्पादक पशुपालकांना पशुसंवर्धन विषयक केसीसी कार्ड उपलब्ध करून देण्याबाबत राष्ट्रव्यापी मोहीम आयोजित केली आहे. त्यासाठी अनेक बैठका, पत्रव्यवहार, दुरुस्ती सभा, ग्रामसभा, प्रत्यक्ष भेटी यातून प्रयत्न करण्यात येत आहेत. राज्य पशुसंवर्धन विभागाला दहा लाख किसान क्रेडिट कार्ड वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. या कार्डधारकांना विनातारण रू. १.६० लाख कर्ज उपलब्ध करून दिला जाणार आहे व दूध संस्थेने हमी दिल्यास रु. ३ लाखापर्यंत पतपुरवठा केला जाणार आहे. व्याजदर ७ टक्के व नियमित कर्ज फेडणाऱ्यांना ३ टक्क्यांपर्यंत सवलत




देण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत पशुधन देखभालीसाठी खेळत्या भांडवलासह व्याज अनुदान व क्रेडिट सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. अलीकडे जे पशुपालक शेळ्या मेंढ्या, वराह, कुक्कुटपालन यासारख्या विविध पशुसंवर्धन विषयक कार्यात सहभागी आहेत, तसेच दूध सोसायटीचे सभासद आहेत अशा सर्व बाबींसाठी पशुसंवर्धनविषयक केसीसी कार्ड उपलब्ध करून देण्यात येणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी इतर सर्व विभागांसह जिल्हा अग्रणी बँकांचा सहभाग फार महत्त्वाचा आहे. त्यासाठी राज्यातील विभागवार असणाऱ्या स्टेट बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ इंडिया यांचा समावेश आहे. ऑगस्ट २०२३ अखेर राज्यातून एकूण १,९३,१३२ अर्ज बँकेत सादर करण्यात आले आहेत. पैकी ७९,१४० अर्ज मंजूर करून केसीसी कार्ड वितरित केले आहेत. म्हणजे १० लाख उद्दिष्टाच्या तुलनेत फक्त ७.९१% पशुपालकांना पशुसंवर्धन विषयक केसीसी कार्ड वितरित झाली आहेत. तुलनेत तामिळनाडू, राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यांचे काम ५० ते ७० टक्के झालेले आहे. त्यामुळे याबाबतीत प्रसिद्धी, प्रचार आणि अर्ज गोळा करणाऱ्या पशुसंवर्धन विभागाला राज्य सरकार व केंद्र सरकारकडून दोषी ठरवले जात आहे. त्यामुळे क्षेत्रीय स्तरावर अर्ज गोळा करणे, बँकांना पाठवणे त्यासाठी प्रयत्न करणारे पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक व आढावा घेऊन समन्वय साधणारे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त हे देखील जबाबदार ठरवण्यात येत आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# जितनी आबादी उतनी भागीदारी!

## एकाच घरातून इतके पंतप्रधान कसे : देवेंद्र फडणवीस

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**काँग्रेस पक्ष नेहमी सांगतो 'जितनी आबादी उतनी भागीदारी, मग एकाच घरातून इतके का पंतप्रधान कसे, याचे उत्तर काँग्रेस देणार का? असा सवाल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. भाजपच्या ओबीसी जागर यात्रेच्या समारोप पोहरादेवी येथे झाला. त्यावेळी ते बोलत होते.**





यावेळी बाबुसिंग महाराज, जितेंद्र महाराज, कबीर महाराज, यशवंत महाराज, केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे, खा. रामदास तडस, खा. डॉ. अनिल बोंडे, आमदार डॉ. संजय कुटे, ओबीसी जागर यात्रेचे माजी आमदार डॉ. आशीषराव देशमुख, संजय गाते, राजेंद्र पाटणी, श्वेता महाले, निलय नाईक, दादाराव केचे, देवराव होळी आदी नेते उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले की, मंडल आयोगाला विरोध करणारे काँग्रेस, उद्धव ठाकरे हेच होते. आज एक ओबीसी पंतप्रधान आहे आणि ओबीसींसाठी काम करणारा नेता उभा राहतो, तेव्हा या ओबीसी नेत्याला संपविण्यासाठी २५ पक्ष एकत्र आले. पण, एक सांगतो, 'जो ओबीसी की बात करेगा, वही देश पे राज करेगा'. मोदी केवळ भाषणं करीत नाही, तर त्यांच्या योजनांचा लाभ हा एससी, एसटी, ओबीसींना मिळाला पाहिजे यासाठी प्रयत्न करतात. आज केंद्रात ६० टक्के ओबीसी, एससी, एसटी मंत्री आहेत. पीकविम्याचा ७१ टक्के लाभ एससी, एसटी, ओबीसींना होत आहे, पीएम किसान सन्मान निधीचे लाभार्थी ८० टक्के लाभार्थी एससी, एसटी, ओबीसी आहेत.

प्रधानमंत्री आवास योजनेत ४५ टक्के लाभार्थी ओबीसी आहेत. विविध प्रकारच्या शिष्यवृत्तीत ५८ टक्के विद्यार्थी एससी, एसटी, ओबीसी आहेत. मुद्राचा लाभ मिळालेले ५१ टक्के एससी, एसटी, ओबीसी आहेत. काँग्रेसने आजवर जे मुख्यमंत्री दिले, त्यातील केवळ १७ टक्के ओबीसी होते. तर भाजपाने जितके मुख्यमंत्री दिले, त्यातील ३१ टक्के मुख्यमंत्री ओबीसी होते, असे सांगून फडणवीस म्हणाले की, १९३१ नंतर एससी, एसटी वगळता कधीच जात निहाय जनगणना झाली नाही. तत्कालिन गृहमंत्री पी. चिदम्बरम यांनी ७ मे २०११ रोजी संसदेत सांगितले की, आम्ही जाती जनगणना करणार नाही. हेही सांगितले गेले की, स्वातंत्र्यानंतर नेहरुंच्या काळात एकमताने जाती जनगणना करायची नाही, असे ठरले. आमचा जात जनगणनेला विरोध नाही. पण २०११ मध्ये जेव्हा केंद्र सरकारवर दबाव आला, तेव्हा झालेल्या एसईसीसीच्या सर्वेक्षणात ५५०० जातींची संख्या ४६ लाखांवर पोहोचली, तर महाराष्ट्रातील ४९४ जातींची संख्या ४ लाखांच्या वर गेली. राज्यात आमचे सरकार आले तेव्हा ओबीसींसाठी वेगळे मंत्रालय तयार केले आणि त्याला निधी दिला. आज अनेक योजना या मंत्रालयामार्फत अंमलात आणल्या जात आहेत. ३६ वसतीगृह ओबीसींसाठी सुरु होत आहेत. मोदी आवास योजनेच्या माध्यमातून ओबीसींसाठी १० लाख घरांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. प्रत्येक ओबीसी समाजघटकासाठी सरकारने काम सुरु केले. ओबीसी आयोगाला संवैधानिक दर्जा देण्याचे काम केले. मेडिकलच्या राष्ट्रीय कोट्यात ओबीसींना २७ टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेतला. बारा बलुतेदारांसाठी विश्वकर्मा योजना सुरु केली. १३,००० कोटी रुपये त्यासाठी दिले. मराठा, धनगर आरक्षण आम्ही देऊच. प्रत्येक समाजाला त्यांचे अधिकार देऊ. पण, असे करताना कुणाचे ओरबाडून घेणार नाही. काही लोक दुसऱ्याच्या खांद्यावर बंदूक ठेऊन राजकारण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. काही विरोधकांना महाराष्ट्र अशांत ठेवायचा आहे. पण, तो प्रयत्न आम्ही खपवून घेणार नाही. सोयाबीन शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य सरकार वचनबद्ध आहे. गेल्याच मंत्रिमंडळ बैठकीत पंचनामे तातडीने करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

### काँग्रेस ओबीसी द्रोही : देशमुख

केंद्र सरकारने आणि राज्य सरकारने ओबीसी समाजासाठी करोडो रुपयांच्या ज्या कल्याणकारी योजना आणल्या आहेत, त्या ओबीसी समाजाच्या प्रत्येक घटकांपर्यंत पोहोचाव्यात म्हणून आम्ही ही यात्रा काढली आहे. प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतून ओबीसी समाजाच्या प्रत्येक लहान घटकांची आर्थिक उन्नती होणार आहे. भाजपा ओबीसींचा आणि ओबीसी भाजपाचा हा आमचा मूलमंत्र असून ओबीसी समाजावर अन्याय होऊ देणार नाही. भाजपाचा निर्धार, ओबीसींचा करू उद्धार या तत्वावर भाजपा काम करीत आहे. भाजपा १०० टक्के ओबीसींच्या पाठीशी आहे. ओबीसींचे आरक्षण कमी न करता मराठ्यांना वेगळे आरक्षण मिळावे, ही आमची भूमिका आहे. त्यासाठी राज्याचे आमचे सरकार प्रयत्न करत आहेत. जरांगेंच्या माध्यमातून राजकीय पोळी शेकण्याचे काम विरोधक करत आहेत. ही बाब जरांगे यांनी सुद्धा समजावून घ्यावी, असेही ते म्हणाले.

# बिनबुडाच्या आरोपांना भीक घालत नाही!

## सातार्‍याची लूट प्रकरणावरुन उदयनराजेंचं शिवेंद्रराजेंना प्रत्युत्तर

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सुविधा हव्यात पण घरपट्टी नको, मग सुविधा कशा मिळणार, सुविधा हव्या असतील घरपट्टी द्यावी लागेल असे नागरिकांना निर्देश देत लोकांमध्ये संभ्रम निर्माण करून बिनबुडाच्या आरोपांना भीक घालत नाही अशी जोरदार टीका खासदार उदयनराजे भोसले यांनी आमदार शिवेंद्रसिंहराजे यांच्यावर केली.**

आमदार शिवेंद्रसिंहराजे यांनी सातारा पालिकेने हद्दवाढ भागात आकारलेल्या घरपट्टीच्या अनुषंगाने शुक्रवारी आक्रमक होत् उदयनराजे यांच्या सातारा विकास आघाडीने सातार्‍याची लूट केल्याचा आरोप केला होता त्याला उदयनराजे यांनी जल मंदिर येथे पत्रकार परिषदेत जोरदार प्रत्युत्तर दिले. यावेळी सातारा विकास आघाडीचे नेते सुनील काटकर व माजी उपनगराध्यक्ष मनोज शेंडे आदी पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते. सगळी सोंगे आणता येतात पैशाचे सोंग आणता येत नाही. सुविधा हव्यात पण घरपट्टी नको



मात्र महसूल मिळायला हवा. काही महाभाग घरपट्टीच भरत नाहीत. मग सुविधा मिळणार कशा ? घरपट्टीच्या संदर्भाने टीका करणारे विद्वान असावेत, काही झाले की सातारा विकास आघाडीने लूट केली अशी टीका करायची असे सांगून ते म्हणाले, लोकांना सुविधा पुरवण्यासाठी सातारा विकास आघाडी स्थापन झाली आहे. तुमच्याकडे एकहाती सत्ता होती. तुम्ही काम केले नाही म्हणूनच आम्हाला भूमिका घ्यावी लागली. सातारकरांचा आमच्यावर विश्वास आहे, त्याला आम्ही पात्र ठरलो आहोत. हद्दवाढीसाठी आम्ही १२४ कोटी रुपयांचा निधी आणला मात्र पैशाचे सोंग आणता येत नाही. सुविधा हव्यात पण घरपट्टी नको, मग सुविधा कशा मिळणार,. सुविधा हव्या असतील घरपट्टी द्यावी लागेल.

### मी जात मानत नाही : उदयनराजे

छत्रपती शिवरायांच्या वाघनखांच्या संदर्भाने ते म्हणाले, या विषयावर काही तज्ञांनी पुरावे दिलेले आहेत त्यामुळे मी काही या विषयावर जास्त बोलणार नाही. मात्र वाघनखे इग्लंडला पाठविण्यात आली तेव्हा मी नव्हतो अशी मिश्किली उदयनराजे यांनी केली. मराठा क्रांती मोर्चाची जालना येथे शनिवारी सभा होत आहे, त्या संदर्भाने बोलताना उदयनराजे म्हणाले मराठा आरक्षण सभेला मी जाणार नाही. जात पात मी मानत नाही. दर दहा वर्षावर आरक्षण दिले पाहिजे. त्यावेळच्या राज्यकर्त्यांची चुकी आहे, असे ठाम मत आहे.

# इस्रायल-हमास युद्ध चिघळणार?

## गाझातील नागरिकांना स्थलांतर करण्याचे आदेश

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

इस्रायल आणि हमासदरम्यान सुरू झालेले युद्ध सातव्या दिवशीही सुरू आहे. हे युद्ध लवकर संपुष्टात येईल असे कोणतेही चिन्ह दिसत नाही. त्यामुळे गाझा पट्टीत हमासविरोधात जमिनीवरील मोहीम सुरू करण्यासाठी सैन्य सज्ज होत असल्याचे इस्रायलच्या लष्करातर्फे सांगण्यात आले. दरम्यान, २४ तासांच्या आत उत्तर गाझा रिकामे करण्याचे आदेश इस्रायलने दिले आहेत. जवळपास ११ लाख नागरिकांना गाझातून स्थलांतरीत व्हावं लागणार आहे.



इस्रायलच्या एकूण लोकसंख्येच्या ५० टक्के ही लोकसंख्या आहे. पॅलेस्टाईनची दहशतवादी संघटना हमासने गाझा पट्टीवरून इस्रायलवर हल्ला चढवला आहे. त्यामुळे इस्रायलनेही गाझा पट्टीवरील नागरिकांची नाकाबंदी केली आहे. पाणी, अन्न, इंधन पुरवठा बंद करण्यात आला आहे. तर, हमास ओलिसांची सुटका करत नाही तोपर्यंत गाझा पट्टीमध्ये कोणतीही मानवतावादी मदत पोहोचू दिली जाणार नाही असा इशारा इस्रायलचे ऊर्जामंत्री इस्रायल काट्झ यांनी दिला. दुसरीकडे इस्रायलने गाझातील नागरिकांना स्थलांतर करण्याचे निर्देश दिले आहेत. परंतु, यामुळे विनाशकारी मानवतावादी परिणामांशिवाय हे आदेश अशक्य असल्याची प्रतिक्रिया संयुक्त राष्ट्राचे प्रवक्ते स्टीफन दुजारिक दिली आहे. म्हणजेच, यामुळे विनाशकारी मानवतावादी परिणाम होतील, असा इशारा देण्यात आला आहे. गाझा शहरातील सर्व नागरिकांना त्यांच्या स्वतःच्या सुरक्षिततेसाठी आणि संरक्षणासाठी गाझाच्या दक्षिणेकडे स्थलांतर करण्याचे आवाहन केले आहे. हमास या दहशतवादी संघटनेने इस्रायलविरुद्ध युद्ध पुकारले आहे आणि गाझा शहर हे असे क्षेत्र आहे जिथे सर्वाधिक लष्करी कारवाया होत आहेत. त्यामुळे तुमचं स्थलांतर तुमच्या स्वतःच्या सुरक्षिततेसाठी आहे. येथील परिस्थिती पूर्ववत झाल्यानंतर तुम्हाला परत येण्याकरता घोषणा केली जाईल, त्यावेळी तुम्ही येथे परत येऊ शकाल.

### हमासकडून आदेशाची खिल्ली

» इस्रायलसह सुरक्षा कुंपणाच्या क्षेत्राजवळ जाऊ नका. हमासचे दहशतवादी गाझा शहरात घरांच्या खाली असलेल्या बोगद्यांमध्ये आणि निष्पाप गाझान नागरिक असलेल्या इमारतींमध्ये लपले आहेत. गाझा शहरातील नागरिकांनो, तुमच्या स्वतःच्या सुरक्षिततेसाठी आणि तुमच्या कुटुंबियांच्या सुरक्षिततेसाठी दक्षिणेतून बाहेर पडा आणि तुमचा मानवी ढाल म्हणून वापर करणाऱ्या हमासच्या दहशतवाद्यांपासून स्वतःला दूर ठेवा. पुढील काही दिवस, IDF गाझा शहरात लक्षणीयरीत्या कार्यरत राहणार आहे. गाझातील नागरिकांसाठी इस्रायलने स्थलांतर होण्याचे आदेश दिल्याने हमासने खिल्ली उडवली आहे. हा बनावट प्रचार असल्याचा आरोप हमासने केला आहे. तसंच, नागरिकांनी या प्रचाराला बळी न पडण्याचे आवाहन हमासने केले आहे.

# युद्धाचे उत्तर प्रदेशात पडसाद!

## अलिगडमध्ये पॅलेस्टाईनच्या समर्थनात मोर्चा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

इस्रायल आणि पॅलेस्टाईनमधील दहशतवादी संघटना हमास यांच्यात गेल्या सहा दिवसांपासून युद्ध सुरू आहे. या युद्धाचे जगभर पडसाद उमटू लागले आहेत. या युद्धामुळे जगाची दोन गटांमध्ये विभागणी झाली आहे. अनेक देशांनी इस्रायलला पाठिंबा दर्शवला आहे. तर काही राष्ट्रांनी पॅलेस्टाईनची बाजू घेतली आहे. त्याचबरोबर वेगवेगळ्या देशांमधील मुस्लीम संघटनांकडून पॅलेस्टाईनचं समर्थन केलं जात आहे. भारत या युद्धात इस्रायलच्या बाजूने उभा आहे. परंतु, भारतातल्या काही संघटनांनी पॅलेस्टाईनच्या समर्थनात आवाज उठवला आहे.



### पॅलेस्टाईनच्या समर्थनात रस्त्यावर

» ९ ऑक्टोबर रोजी शेकडो विद्यार्थ्यांनी पॅलेस्टाईनच्या समर्थनात मोर्चा काढला होता. चेन्नई आणि कोलकात्यातही इस्रायलच्या विरोधात मोर्चे काढण्यात आले होते. एसआयओ इडिया नावाच्या संघटनेने इस्रायलविरोधात देशभर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. तमिळनाडू मुस्लीम मुनेत्र कळघम ही संघटना पॅलेस्टाईनच्या समर्थनात चेन्नईच्या रस्त्यांवर उतरली आहे. तर कोलकात्यात मायनॉरिटी यूथ फोरम ही संघटना पॅलेस्टाईनच्या समर्थनात आंदोलन करत आहे.

उत्तर प्रदेशातल्या अलिगड मुस्लीम विद्यापीठात तीन दिवसांपूर्वी पॅलेस्टाईनच्या समर्थनात एक मोर्चा काढण्यात आला होता. यामुळे उत्तर प्रदेशातलं योगी आदित्यनाथ सरकार संतापलं आहे. इस्रायल-हमास युद्धात भारत सरकारच्या भूमिकेविरोधात कोणतंही वक्तव्य अथवा कृतीवर राज्य सरकारकडून कडक कारवाई केली जाईल, असा इशारा योगी सरकारने दिला आहे. नवरात्रोत्सव आणि आगामी सणासुदीच्या काळात राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेबाबत मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी आदित्यनाथ यांनी जिल्हाधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या की, इस्रायल-हमास युद्धात भारत सरकारने घेतलेल्या भूमिकेविरोधातली कृती राज्यात कुठेही दिसता कामा नये. इस्रायल-पॅलेस्टाईन युद्धाचा उल्लेख करत योगी आदित्यनाथ यांनी पोलिसांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. सर्व पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांच्या विभागातील धर्मगुरूंशी संवाद साधावा आणि राज्यात भारत सरकारच्या भूमिकेविरोधातली कुठलीही घटना घडता कामा नये, याची काळजी घ्यावी. समाजमाध्यमांवर अथवा कोणत्याही धार्मिक ठिकाणी कुठल्याही प्रकारची उन्मादी, विक्षिप्त वक्तव्ये खपवून घेतली जाणार नाहीत. कोणी जर तसा पयत्न केला तर अशा लोकांवर तातडीने कारवाई करावी, असे आदेश योगी आदित्यनाथ यांनी दिले आहेत.

# संत्रा उत्पादक शेतकरी संकटात!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

बांगलादेशं घेतलेल्या एका निर्णयामुळ विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकरी आणि व्यापारी आर्थिक संकटात सापडला आहे. बांगलादेशमध्ये वैदर्भीय संत्र्यावर प्रति किलो 88 रुपये एवढे प्रचंड आयात शुल्क लावलं आहे. यामुळं विदर्भातील तब्बल अडीच लाख टन संत्रा शेतातच पडून राहण्याची भीती निर्माण झाली आहे. बांगलादेशमध्ये वैदर्भीय संत्र्यावर प्रति किलो 88 रुपये एवढे प्रचंड आयात शुल्क लावल्यामुळे विदर्भातील तब्बल अडीच लाख टन संत्रा शेतातच पडून राहण्याची भीती निर्माण झाली आहे. बांगलादेशी आयात शुल्क आणि त्याबद्दल केंद्र सरकारची उदासीनता लाखो संत्रा उत्पादक शेतकरी आणि व्यापाऱ्यांना अडचणीत आणणारी आहे. लवकर याच्यातून मार्ग काढला गेला नाही तर भविष्यात संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्या पाहव्या लागतील अशी भीती तज्ञांनी व्यक्त केली आहे. विदर्भातील हजारो संत्रा बागांमध्ये पिकलेल्या गोड, रसाळ संत्र्यापैकी तब्बल अडीच लाख टन संत्रा यंदा बाजारपेठेत जाण्याऐवजी शेतात पडून राहण्याची भीती निर्माण झाली आहे. कारण बांगलादेशाने भारतीय संत्र्यावर तब्बल 88 रुपये प्रति किलो एवढं आयात शुल्क लावले आहे. गेल्या काही वर्षात सातत्याने वाढणाऱ्या आयात शुल्कामुळं सध्या बांगलादेशला एका ट्रकमध्ये 28 टन संत्रा पाठवण्यासाठी तब्बल 21 लाख रुपये आयात शुल्क म्हणून द्यावे लागत आहेत. त्यामुळं भारतीय व्यापाऱ्यांनी बांगलादेशी बाजाराकडे पूर्णपणे पाठ वळवली आहे. गेल्या काही वर्षात विदर्भातून बांगलादेशला संत्रा निर्यातीचा प्रमाण प्रचंड वाढले असून सध्या अडीच लाख टनापेक्षा जास्त संत्रा बांगलादेशला निर्यात होतो. मात्र, गेल्या काही वर्षात टप्प्याटप्प्याने वाढलेल्या आयात शुल्कामुळं आता या अडीच लाख टन संत्र्याला भारतीय बाजारपेठेतच खपवण्याची वेळ शेतकरी आणि व्यापाऱ्यांवर आली आहे.

# स्पृहा जोशीने केलं रसिकाचे कौतुक!



सूर नवा ध्यास नवा हा कार्यक्रम नुकताच नव्या ढंगात सुरु झाला. यंदाची थीम नव्या नवलाईवर आधारित आहे. पण सोबतच त्यात नवा बदलही झाला. तो म्हणजे यावेळी शोमध्ये स्पृहा जोशी ऐवजी अभिनेत्री रसिका सुनील सूत्रसंचालकाची भूमिका पार पाडत आहे. ढोलकीच्या तालावर या शोच्या महाअंतिम सोहळ्यात रसिकाने हे सरप्राइज उघड केले आणि सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. गेले अनेक सीझन या शोच्या सूत्रसंचालकाची धूरा स्पृहा जोशीच सांभाळत असल्यामुळे अनेकांसाठी ही बातमी अनपेक्षित होती. गेले काही दिवस रसिकाची सतत स्पृहासोबत तुलना केली जात होती. त्यामुळे तिने, " मला एकदा तरी स्पृहाशी बोलावेच लागेल, सुरुवातीला मी खूप खुश होते पण लोकांचा आताचा स्पृहासाठीचा प्रतिसाद पाहता तिच्याशी बोलणे गरजेचे आहे. मला तिच्याकडून खूप काही शिकून घ्यायचे आहे असे ती म्हणाली होती. आता स्पृहाने रसिकाच्या सूत्रसंचालनावर आपले मत व्यक्त केले आहे. लोकमत फिल्मीला दिलेल्या मुलाखतीत स्पृहा म्हणाली की, "एखाद्या गोष्टीत बदल झाला की सगळेच त्या जुन्या गोष्टीला मिस करू लागतात. पण, प्रत्येक नव्या गोष्टीला वेळ द्यायला हवा. पहिल्याच झटक्यात कुणालाच काही सापडत नाही, एखादी गोष्ट हातात यायला प्रत्येकाला वेळ लागतो. माझी खात्री आहे की ती गोष्ट रसिकाच्या पटकन हातात येईल. रसिका उत्तम गायिका आहे. तिने गाणं शिकलं आहे. तसंच तिच्यासाठी सूत्रसंचालन फार अवघड नसेल, ती हे काम उत्तम करेल. रसिकाने सांगितल्याप्रमाणे तिने स्पृहाशी संवाद साधला होता. यावरही तिने प्रतिक्रिया दिली, ती म्हणाली की, "रसिकाने मला फार सुंदर मेसेज केला होता.

# नवीन घरामुळं केतकी माटेगावकर चर्चेत



केतकी माटेगावकर ही मूळची गायिका. पण 'शाळा'मध्ये सुजय डहाके यानं तिला ब्रेक दिला आणि ती सिनेमात आली. त्यानंतर 'काकस्पर्श', 'तानी', 'टाइमपास' असे अनेक सिनेमे तिनं केले. सिनेमात अभिनय करतानाच आपली गायन कलाही तिनं जोपासली. नुकताच तिचा अंकुश हा सिनेमाही प्रदर्शित झालाय. या सिनेमाच्या निमित्तानं तिनं अनेक गोष्ट शेअर केल्या आहे. त्यापैकी एक म्हणजे तिनं मुंबईत स्वत:चं घर घेतलंय. गेल्या काही महिन्यांत अनेक मराठी अभिनेत्रींनी मुंबईत स्वत:चं घर घेतलं. या अभिनेत्रींच्या यादीत आता केतकीही आली आहे. राजश्री मराठीला दिलेल्या एका मुलाखतीत केतकीनं तिच्या या घराबद्दल सांगितलं. घर घेतल्यानंतर सुरू झालेले घराचे हफ्ते हे सगळं ती कशी सांभाळतेय...याबद्दलही केतकीनं सांगितलं आहे. मला मुंबईत घर घ्यायचं होतं. पण हे खरंच शक्य आहे का? असे विचार मनात यायचे. पण हे घराचं पाहिलेलं स्वप्नं आता खरं झालं आहे. घर घ्यायचं ठरवलं तेव्हापासूनच कामाला झोकून घेतलं होतं. पैशांची जुळवाजुळव सुरू केली होती. घराचं डाऊन पेमेंट करताना तर पुरेवाट लागते. अक्षरशः चांदण्या चमकायला लागतात, असं केतकी म्हणाली. पण मी या विचारांची आहे की, केली तेवढी मजा खूप केली. शॉपिंग करायची तेवढी केली, आवडलं की लगेच ऑर्डर केलं.. असं होतं. पण आता स्वत:लाच मी समजवते. एखादी मोठी गोष्ट हवी असेल तर काही गोष्टी कमी कराव्याच लागणार आहेत.अनेक गोष्टी मी स्वत:हून कमी केल्या. शॉपिंग नाही म्हटलं तर नाहीच. खर्च कमी केलेत. कधी आईकडून दगिने घेतले तर अनेकदा मैत्रिणींचे, बहिणींचे कपडे घातले...असं मी केलं. ठरवून बचत केली. आता मी शक्य तेवढं भरपूर काम करतेय. हे घर घेतलं आणि मला आणखी एक सिनेमा मिळाला, असा हा छान योगायोगही केतकीनं सांगितला. तुम्ही एखादी गोष्ट करण्याचं ठरवता तेव्हा अनेक गोष्टी जुळून येतात. घर घेतल्यापासून कामही वाढलं आहे... असं केतकी म्हणाली.

# ऐश्वर्याचे श्वेताशी फारसं पटत नाही!

बॉलिवूड खानादानातील बच्चन परिवार हा नेहमीच चर्चेत असतो. काही दिवसांपूर्वीच या कुटुंबाचे प्रमुख म्हणजेच अमिताभ बच्चन यांनी ८१ व्या वर्षात पदार्पण केले. वयाच्या या टप्प्यातही ते सिनेमा आणि टीव्हीवर खूप सक्रिय आहेत. विश्वसुंदरी ऐश्वर्या रायने बच्चन कुटुंबाची सून होऊन काही वर्षांपूर्वी सर्वांना आश्चर्यचकित केले होते. पण त्यानंतर काही वर्षांनी ऐश्वर्याचे तिची सासू जया बच्चन आणि नणंद श्वेता बच्चन यांच्याशी संबंध चांगले नसल्याचा अंदाज लावला गेला. ते नेहमी एकमेकांपासून अंतर राखत असल्याचे वेळोवेळी दिसून आले. आता पुन्हा एकदा याबद्दल चर्चा सुरू झाली, नुकतेच ऐश्वर्याने सासू जया, नणंद श्वेता आणि भाची नव्या नवेली नंदा यांना फोटोमधून क्रॉप केले. आणि फक्त सासरे अमिताभ बच्चन आणि मुलगी आराध्या बच्चन यांचा फोटो पोस्ट केला. अजूनही श्वेताचे एक जुने विधान चर्चेत आहे, जेव्हा तिने सांगितले होते की वहिनी ऐश्वर्याची कोणत्या कृतीचा तिला खूप राग येतो. करण जोहरने 'कॉफी विथ करण'मध्ये अभिषेक बच्चनची बहीण श्वेता बच्चनला विचारले होते की, तिला वहिनी ऐश्वर्या राय बच्चनमध्ये काय आवडते, काय आवडत नाही आणि तिची कोणती गोष्ट सहन करावी लागते?

# मुंबई मेट्रोत दिसला हृतिक



बॉलिवूड अभिनेता हृतिक रोशन हा नेहमी चर्चेत असतो. तो त्याच्या चित्रपटांमुळे कमी अन् वैयक्तिक आयुष्यामुळे लाईमलाइटमध्ये राहतो. हृतिक त्याच्या दमदार अभिनयासाठी प्रसिद्ध आहे. हृतिक रोशन सध्या त्याच्या आगामी 'फायटर' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. हृतिकचे चाहते देखील या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. दरम्यान हृतिकचे काही फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. या व्हायरल व्हिडिओत हृतिक मुंबई मेट्रोमध्ये प्रवास करताना दिसत आहे. हृतिक रोशन शुक्रवारी मुंबई मेट्रोमध्ये प्रवास करताना अचानक दिसल्याने लोकांना आश्चर्याचा धक्काच बसला. हृतिकने चित्रपटाच्या शूटिंगला जाण्यासाठी आपली कार सोडून थेट मुंबई मेट्रो पकडली. हृतिकने त्याच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर मेट्रो राईडचे फोटो देखील शेअर केले आहेत.

# या गायिकांची हैराण करणारी कोटींची कमाई

हिंदी किंवा मराठी कोणत्याही भाषेतील सिनेमा हा गाण्यांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. गायका - गायिकांना सिनेमातील कलाकारांइतकाच दर्जा आहे. गायक सिनेमातील गाण्यांशिवाय स्वत:चे स्टेज शो करतात. सिनेसृष्टीतील अनेक गायकांनी आपल्या आवाजाने, गाण्यांनी मोठी लोकप्रियता मिळवली आहे. सध्याच्या काळात अनेक महिला गायिका आपले स्वत:चे सिंगिंग शो करतात. त्यांचे







स्वत:चे बँडदेखील आहेत. याद्वारे त्यांची मोठी कमाईदेखील होते. सुनिधि चौहानने तिच्या गाण्यांनी बॉलिवूडमध्ये एक काळ गाजवला. बॉलिवूडमधील ती सर्वाधिक लोकप्रिय गायिकांपैकी एक आहे. रिपोर्ट्सनुसार, सुनिधि एका गाण्यासाठी १२ ते १६ लाख रुपये चार्ज करते. तिची एकूण संपत्ती १०० कोटी रुपये आहे. अलका याग्निक यांची गाणी तुफान गाजली. त्या एका बॉलिवूड गाण्यासाठी १२ लाख रुपये घेतात. अलका याग्निक यांचं नेट वर्थ जवळपास ६० कोटी रुपये आहे.

# न्यूझीलंडने साधली विजयाची हॅट्ट्रिक!

## » कर्णधार विल्यमसन-मिशेलने झळकावली अर्धशतकं

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**आयसीसी एकदिवसीय विश्वचषक २०२३ मधील ११व्या सामन्यात न्यूझीलंड आणि बांगलादेश आमनेसामने आले होते. दोन्ही संघांमधील हा सामना चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात न्यूझीलंडने बांगलादेशचा ८ विकेट्सने पराभव करत सलग तिसरा विजय नोंदवला . या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. बांगलादेशने ५० षटकांत ९ गडी गमावून २४५ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात न्यूझीलंड संघाने ४२.५ षटकांत २ गडी गमावून विजय मिळवला.**



### लॉकी फर्ग्युसनने घेतले 3 बळी

» टॉस हारल्यानंतर प्रथम फलंदाजीला आलेल्या बांगलादेश संघाची सुरुवात खराब झाली. त्यांनी केवळ 67 धावांत 4 विकेट गमावल्या. लिटन दास 0, तनजीद हसन तमीम 16, मेहदी हसन मिराज 30 आणि नझमुल हुसेन शांतो 7 धावा करून बाद झाले. या सुरुवातीच्या झटक्यानंतर कर्णधार शकिब अल हसन आणि मुशफिकर रहीम यांनी संघाची धुरा सांभाळली. दोघांनी अर्धशतकी भागीदारी करत संघाची धावसंख्या शंभरच्या पुढे नेली. शाकिब 40 धावा करून बाद झाला आणि दोघांमधील 96 धावांची भागीदारी तुटली. मुशफिकुर रहीमने आपले अर्धशतकही पूर्ण केले. तो 66 धावा करून बाद झाला आणि बांगलादेशच्या मोठ्या धावसंख्येपर्यंत नेण्याच्या आशा मावळल्या. त्याला मॅट हेन्रीने बाद केले. न्यूझीलंडकडून लॉकी फर्ग्युसनने सर्वाधिक 3 बळी घेतले.

न्यूझीलंडकडून डॅरिल मिशेलने सर्वाधिक नाबाद ८९ धावा केल्या. कर्णधार केन विल्यमसनने ७८ धावांची खेळी केली. तो रिटायर्ड हर्ट होऊन तंबूत परतला. तसेच डेव्हॉन कॉनवेने ४५ धावांचे योगदान दिले. रचिन रवींद्र नऊ धावा करून बाद झाला. ग्लेन फिलिप्सने नाबाद १६ धावा केल्या. मुस्तफिजुर रहमान आणि शाकिब अल हसन यांना प्रत्येकी एक विकेट घेतली. त्याचबरोबर लॉकी फर्ग्युसन सामनावीर ठरल. तत्पूर्वी नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या बांगलादेश संघाने सातत्याने विकेट्स गमावल्याने ५० षटकांत ९ गडी गमावून २४५ धावा केल्या होत्या. बांगलादेशकडून अनुभवी फलंदाज मुशफिकुर रहीमने सर्वाधिक ६६ धावा केल्या. अनुभवी खेळाडू महमुदुल्लाहने नाबाद ४१ आणि कर्णधार शकीब अल हसनने ४० धावा केल्या. न्यूझीलंडकडून लॉकी फर्ग्युसनने तीन, ट्रेंट बोल्ट आणि मॅट हेन्रीने प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. बांगलादेशविरुद्ध न्यूझीलंडकडून लॉकी फर्ग्युसन हा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. वेगवान गोलंदाजाने १० षटके टाकली आणि सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. ज्यामध्ये तनजी हसन, मेहदी हसन मेराज आणि कर्णधार शकीब अल हसन यांचा समावेश होता. या सामन्यादरम्यान किवी वेगवान गोलंदाज ट्रेंट बोल्टने विशेष कामगिरी केली. वनडेमध्ये २०० विकेट घेणारा तो न्यूझीलंडचा पाचवा गोलंदाज ठरला आहे. किवी संघाकडून वनडेमध्ये सर्वाधिक विकेट घेण्याचा विक्रम डॅनियल व्हिटोरीच्या नावावर आहे. व्हिटोरीने न्यूझीलंडसाठी २९१ सामन्यांत २९७ विकेट्स घेतल्या आहेत. न्यूझीलंड संघाने विश्वचषकात आणखी एक मोठा विजय मिळवला. बांगलादेशचा पराभव करून त्यांनी सलग तिसरा विजय संपादन केला. किवी संघाने यापूर्वी इंग्लंड आणि नेदरलँड्सचा पराभव केला होता. आता त्याचे तीन सामन्यांत सहा गुण झाले आहेत. पॉइंट टेबलमध्ये न्यूझीलंड पहिल्या स्थानावर आहे. दुसरीकडे, बांगलादेशचा हा दुसरा पराभव आहे. अफगाणिस्तानविरुद्धच्या विजयानंतर त्याला इंग्लंड आणि न्यूझीलंडविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला आहे. 92 धावांवर दुसरी विकेट गमावल्यानंतर कर्णधार केन विल्यमसनने डॅरिल मिशेलसह न्यूझीलंडची धुरा सांभाळली.

# क्रिकेटचा ऑलिम्पिकमध्ये होणार समावेश

## » आंतरराष्ट्रीय समितीची मिळाली परवानगी

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने क्रिकेटचा 2028 च्या लॉस एंजलेस ऑलिम्पिक गेम्समध्ये समावेश करण्यासाठी परवानगी दिली आहे. याबाबतची घोषणा आज करण्यात आली. आयओसी अध्यक्ष थॉमस बेच यांनी मुंबईतील बोर्ड मिटिंगनंतर बोलताना याची माहिती दिली. क्रिकेट सोबतच बेस बॉल, सॉफ्ट बॉल, फ्लॅग फुटबॉल लॅक्रॉसे आणि स्क्वॉश खेळांचा देखील सामावेश करण्यासाठी समितीने परवानगी दिली आहे. मात्र या सर्व नवीन खेळांच्या बाजूने आयओसी सदस्य देशांनी देखील मतदान करणे गरजेचे आहे.**



यासाठी सोमवारी मतदार प्रक्रिया राबलवी जाईल त्यानंतर या खेळांचा 2028 च्या लॉस एंजलेस येथील ऑलिम्पिक गेम्समधील समावेश निश्चित होईल. थॉमस यांनी सांगितले की, 'ऑलिम्पिक समितीने लॉस एंजलेस ऑलिम्पिकमध्ये 5 नवीन खेळ समाविष्ट करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. समितीने तो प्रस्ताव मान्य केला आहे.

यात बेसबॉल - सॉफ्टबॉल, फ्लॅग फुटबॉल, लाक्रोसे, स्क्वॉश आणि क्रिकेट यांचा समावेश आहे.' क्रिकेटच्या ऑलिम्पिक समावेशाचं घोडं हे वाडा (WADA) आणि बीसीसीआय यांच्यातील वादामुळे अडलं होतं. अखेर बीसीसीआय आणि आयसीसीने 2016 मध्ये अँटी डोपिंगची जागतिक संघटना वाडाच्या धोरणांचा स्विकार केला.

आता महिला क्रिकेट देखील प्रसिद्ध होऊ लागलं आहे. त्यामुळे क्रिकेटच्या ऑलिम्पिक समावेशाचा मार्ग मोकळा झाला. गेली राष्ट्रकुल स्पर्धा आणि नुकतीच झालेल्या एशियन गेम्समध्ये क्रिकेटचे पुनरागमन झाले. राष्ट्रकुल स्पर्धेत फक्त महिला क्रिकेटचा समावेश होता. तर एशियन गेम्समध्ये पुरूष क्रिकेट आणि महिला क्रिकेट दोन्हीचा समावेश होता. भारतीय महिला आणि पुरूष संघाने सुवर्ण पदक पटकावले.

# भारत-पाकिस्तान सामन्यावर पावसाचे सावट

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

भारत आणि पाकिस्तान यांच्यात शनिवारी (१४ ऑक्टोबर) एकदिवसीय विश्वचषक २०२३ मधील १२वा सामना रंगणार आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर दोन्ही संघ आमनेसामने येणार आहेत. सध्याच्या एकदिवसीय विश्वचषकात दोन्ही संघांचा फॉर्म चांगला आहे. भारताने ऑस्ट्रेलिया आणि अफगाणिस्तानविरुद्ध विजय मिळवला आहे. त्याचवेळी पाकिस्तानने नेदरलँड आणि श्रीलंकेचा पराभव केला होता. आता रोहित शर्मा आणि बाबर आझम यांच्या नजरा विजयाची हॅट्ट्रिक करण्यावर असतील. दरम्यान, हवामानाबाबत मोठी बातमी समोर आली आहे. अनेक दिवसांपासून चाहते या सामन्याची वाट पाहत होते. सामन्यादरम्यान स्टेडियममध्ये एक लाखाहून अधिक प्रेक्षक उपस्थित राहू शकतात. प्रत्येकाला रोमांचक सामना पाहायचा आहे, परंतु पावसाने आशा धुळीस मिळवू शकतो. भारतीय हवामान खात्याने (आयएमडी) अहमदाबाद शहर आणि उत्तर गुजरातमध्ये सामन्यादरम्यान हलक्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. आयएमडीने शेअर केलेल्या लेटेस्ट हवामान अपडेटनुसार, १४ आणि १५ ऑक्टोबर रोजी उत्तर गुजरात आणि अहमदाबादच्या काही भागात हलका पाऊस पडू शकतो. हवामान खात्याने सांगितले की, “गुजरातमध्ये पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहण्याचा अंदाज आहे. १४ ऑक्टोबर रोजी अहमदाबाद जिल्ह्यात काही ठिकाणी हलका पाऊस पडू शकतो.” अहमदाबादमधील हवामान केंद्राच्या संचालक मनोरमा मोहंती म्हणाल्या, “आकाश ढगाळ असेल.